# मा.वसंतदादा पाटील यांचे १९४२ च्या स्वातंत्र्य लढयातील कार्य

प्रा.डॉ.कदम संतोष तुकाराम इतिहास विभाग, मुधोजी महाविद्यालय, फलटण मोबाईल :- ९४२३८०२५६०

---

**प्रस्तावना :-**भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा काळ हा एक आधुनिक भारताच्या इतिहासातील एक गौरवशाली पर्व होऊन गेले. सन १८१८ नंतर पटवर्धन सरदारांनी इंग्रजाची बाजू घेऊन त्याच्या जहागिरी शाबूत ठेवल्या. सांगलीच्या पटवर्धन संस्थानाशी ईस्ट इंडिया कंपनीने सन १८२० ला स्वतंत्र्य तह केला.[१] व संस्थानाला संरक्षण दिले. सन १८१८ ते १८२५ पर्यंत सांगली संस्थानात ब्रिटीशांच्या विरोधात असंतोष दिसत नाही. सन १९०० नंतर सांगली संस्थानात स्वातंत्र्य चळवळीची बिजे दिसू लागतात. सन १९२१ नंतर सांगलीचे वामनराव पटवर्धन, ग.रा.अभ्यंकर यांच्या प्रयत्नाने 'दक्षिण संस्थान हितवर्धक' सभा स्थापन झाली. स्वातंत्र्य चळवळीस जोर आला. संस्थांनी प्रजापरिषदा स्थापन झाल्या व सांगली संस्थानात प्रजापरिषदेची एकुण २० अधिवेशने झाली. पुढे सन १९४२ नंतर अनेक स्वातंत्र्य सैनिकांनी आपले बलिदान दिले. अशा या स्वातंत्र्य सैनिकापैकी एक थोर स्वातंत्र्य सैनिक म्हणजे महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री, राजस्थानचे माजी राज्यपाल, सांगलीचे भाग्यविधाते व आधुनिक महाराष्ट्राचे एक शिल्पकार वसंतदादा पाटील हे होत. स्वातंत्र्योत्तर काळात वसंतदादा पाटील यांनी सहकार, शिक्षण व शेती इ. क्षेत्रात केलेले कार्य नवीन पिढीला ज्ञात आहे. त्यांनी स्वातंत्र्य पूर्व काळात भारतीय स्वातंत्र्य चळवळीत जे योगदान दिले आहे त्यावर प्रस्तुत शोधनिबंधात अल्पसा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**अल्पपरिचय :-** वसंतदादा यांचा जन्म सौ.रुक्मिणीबाई व बंडोजी पाटील या दांपत्याच्या पोटी दि. १३/११/१९१७ रोजी सांगली जिल्ह्यातील तासगाव तालुक्यातील पदमाळे या गावी झाला.[२] बंडोजीकडे पद्माळे गावची पाटीलकी तसेच ३० एकर जमीन होती. वसंतदादा १० महिन्याचे असताना त्यांचे आई वडील प्लेगच्या साथीने मरण पावले (१९१८) त्यानंतर वसंतदादा, मोठे बंधू शामराव व आजी यांचा सांभाळ त्यांचे कागलमधील मामा दत्तात्रय पाटील यांनी केला. सुमारे दहा वर्षांनी दादा सज्ञान झाल्यावर आजी पद्माळे येथे आली. त्यांच्या आजीने गावकामगार लक्ष्मण पाटील व संपकाळ गुरुजी या दोघांच्या मदतीने दादांचे प्राथमिक शिक्षण पद्माळे या गावी पूर्ण केले.[३] त्यानंतर त्यांचे सातवी पर्यंतचे शिक्षण सांगली येथे झाले.[४] लहानपणापासून संघटना कौशल्य व जाज्वल्य देशाभिमान त्याच्या ठायी होता. स्वातंत्र्यासाठी सर्वत्र चळवळी चालू होत्या या सर्व बातम्या ते वर्तमान पत्रातून वाचत होते. दि. ६ मे १९३० ला सोलापूरला ताडीचा सत्याग्रह झाला. या वेळी तरुणांना अटक झाली व त्यांना फाशीची शिक्षा दिली. वसंतदादांनी हुतात्म्यांच्या त्यागाची आठवण म्हणून चहा सोडला पुन्हा देश स्वातंत्र्य झाल्यावर दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजी आनंदाने चहा पिऊन संकल्प तडीस नेला. सन १९३० मध्ये त्यांनी काँग्रेसपक्षाचे काम करायला सुरुवात केली. पुढे सन १९३७ मध्ये दादांची तासगाव तालुका काँग्रेसचे चिटणीस म्हणून निवड झाली. त्यांनी अनेक गावे फिरुन काँग्रेसच्या ध्येय धोरणाचा प्रसार केला. दि.२४ मार्च १९४१ रोजी दादांनी 'बिसूर' येथे वैयक्तिक सत्याग्रह केल्याबद्दल सरकारने त्यांना सहा महिन्याची शिक्षा ठोठावून त्यांची रवानगी येरवडा जेलमध्ये केली.[५]

**क्रांतीकार्याची सुरुवात :-**अखिल भारतीय काँग्रेसचे मुंबईला गवालिया टँकवर दि.७/०८/१९४२ ला अधिवेशन सुरु झाले या अधिवेशनाला वसंतदादा उपस्थित होते. दि. ८ ऑगस्टला महात्मा गांधीजीनी ब्रिटिशांना 'चले जाव' म्हटले तसेच लोकांना 'करेंगे या मरेंगे' ! हा मंत्र दिला हीच आपली प्रतिज्ञा झाली पाहिजे. या प्रतिज्ञा पालनासाठी आहुती देण्यास तयार व्हा ! [६] शेवटी गांधीजीनी 'छोडो भारत' ही घोषणा दिली. दि. ९ ऑगस्ट रोजी पहाटे चार वाजताच गांधीजीना सरकारने अटक केली. त्यानंतर लगेच पंडित नेहरु, राजेंद्र प्रसाद, वल्लभभाई पटेल इत्यादी नेत्यांना इंग्रजांनी अटक केली.[७] व पोलिसांनी तेथे जमलेल्या कार्यकर्त्यावर लाठीमार करुन अश्रुधुराचा वापर केला. हजारो कार्यकर्ते पकडले गेले तसेच दादा सरकारच्या अटकेत न सापडता माघारी येवू लागले. मार्गात कार्यकर्त्यांची बैठक होवून सरकारच्या अटकेत न सापडता भूमिगत राहून कार्य करण्याचे ठरले. त्यांनी तासगाव तालुक्यातील गावोगावी फिरुन चावडीवर ध्वज फडकवण्यास प्रोत्साहन दिले. सांगली परिसरामध्ये वि.स.पागे, भाई पेंडसे, पी.बी.पाटील, जिनपाल खोत, डॉ.देशपांडे, मेघजी शहा हे त्यांचे सहकारी होते दि.३ सप्टेंबर १९४२ रोजी तासगावच्या ऐतिहासिक मोर्चामध्ये दादांनी सक्रिय सहभाग घेतला. यावेळी क्रांतीकारकांनी आठ ते दहा हजार लोकांचा जमावासह मामलेदार कचेरीवर मोर्चा काढला. मोर्चातील प्रचंड सामर्थ्य पाहुन मामलेदाराने शासकीय कर्मचाऱ्याच्या जीवितास व मालमत्तेस धोका पोहचण्याची शक्यता निर्माण झाली आहे असे वाटल्याने त्याने मोर्चावाल्यांना झेंडा लावण्यास सहमती दिली.[८] नंतर क्रांतीकारकांनी कचेरीवर ब्रिटीश सरकारचा युनियन जॅक खाली उतरवून तिरंगा ध्वज फडकवला. एवढेच नव्हे तर मामलेदारांना गांधी टोपी घालून झेंडयाला वंदन करायला लावते. त्याचीच पुनरावृत्ती दिवाणी न्यायालयाच्या आवारात करण्यात आली.[९] नंतर पागे साहेबांनी मोर्च्याला उद्देशून भाषण केले. तर श्री. आर.एस.पवार यांनी राष्ट्रगीत म्हटले. मोर्चेवाल्यांनी विजयाच्या आनंदाने कचेरी सोडली.[१०] दि. ४ सप्टेंबर १९४२ रोजी दादांना पांडू मास्तरांनी आपल्यासोबत नेले. वाळवे तालुक्यातील येडेनिपाणीच्या डोंगरावर श्रावणातील शेवटच्या सोमवारी भरणाऱ्या जत्रेत कार्यकर्ते एकत्र जमले होते. या जत्रेतील सभेत पांडू मास्तरांनी दादांची ओळख एक धाडसी कार्यकर्ते म्हणून करुन दिली.[११]

**ब्रिटीश सरकारविरोधी कृत्ये :-**वसंतदादांनी डी.जी.पाटील, दत्तू तात्या, बापू जामदार, वामनकाका पाटील, नारायण जगदाळे, धोंडिराम माळी, रंगराव पाटील, हिंदुराव पाटील इत्यादी कार्यकर्त्यांची तुकडी तयार केली. ब्रिटीश सत्ता खिळखिळी करण्यासाठी विविध विध्वंसक कृत्ये करण्याची योजना आखली. बुधगाव येथील टेलिफोनच्या तारा एका रात्रीत तोडून टाकल्या नोंद्रे व कर्नाळ रेल्वेमार्गावरील रेल्वे रुळ उखडून टाकले व मिरज, बुधगाव या दरम्यानची रेल्वे लुटलेली होती.[१२] यावेळी ई.एस.मोडक या पोलीस अधिकाऱ्याच्या मार्गदर्शनाखाली दि. २२/७/१९४३ ला सांगली शहरातील एका घरावर छापा घालून वसंतदादा व इतर त्यांचे सहकारी यांना अटक करण्यात आली.

**दारुगुत्ते उध्वस्त :-**दारुमुळे गरीब कुटुंबाची मोठ्या प्रमाणात वाताहात होते. वसंतदादा व त्यांच्या सहकाऱ्यांनी दारूगुत्ते उध्वस्त करण्याची योजना आखली. मिरज, कवठेमहांकाळ रस्त्यावरील आलकुड येथील दारूगुत्ता प्रसिध्द होता. १०-१५ सहकाऱ्यांना बरोबर घेवून दादांनी एके रात्री तो उध्वस्त केला. माघारी येत असताना पाटगाव येथील दारूगुत्ताही उध्वस्त केला.[१३]

**स्पेशल पे ट्रेन लुटण्याची योजना :-**कुंडल ग्रुपने स्पेशल पे ट्रेन लुटण्याची योजना आखली होती. त्यासाठी तयार राहण्याची सूचना दादांना आली होती. दादा तयारी करून पुढील निरोपाची वाट पहात होते. परंतु निरोप येण्याऐवजी कुंडल ग्रुपने स्पेशल पे ट्रेन लुटल्याचे समजले. उत्साहाने केलेली तयारी वाया गेली म्हणून दादांनी स्वतःच रेल्वे मालगाडी पाडण्याचे ठरविले. कुपवाडच्या रानात रेल्वे मालगाडी पाडण्यात आली.[१४]

**पोलीसांना अनेक वेळा गुंगारा:-**पोलीसांच्या दप्तरी दादांवर जाळपोळ व सरकारी मालमत्तेचा विध्वंस करणे तसेच निमणी येथील इन्स्पेक्शन बंगला जाळणे अशा अनेक गुन्ह्याची नोंद होती.[१५] म्हणून मुंबई सरकारने दादांना पकडण्यासाठी १०००/- रूपयांचे बक्षीसही जाहीर केले होते. कुरळप या ठिकाणी सर्व कार्यकर्ते भेटीस आले होते. यावेळी पोलीसांनी घातलेल्या छाप्यातून ते सहीसलामत वाचले. कोल्हापूरात गंगावेशीतील एका खानावळीत वसंतदादा, पांडु मास्तर, आण्णा पाडळकर व रंगराव पाटील हे थांबले होते. यावेळी पोलीसांनी छापा घालून सर्वांना पकडले. पकडून नेणाऱ्या पोलीसांस चकवून ते तेथून निसटले. पुढे सांगलीत जैन बोर्डींगमध्ये असताना पोलीसांनी त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला पण ते पकडू शकले नाहीत.[१६]

**दादांना अटक व तुरूंगातून पलायनाचा प्रयत्न :-**दि.२२ जुलै १९४३ च्या रात्री घरभेद्यामुळे दादा पकडले गेले. त्यांच्यावर खटला चालू होता. त्याचा दि. २४ जुलै १९४३ ला न्यायाधिश निकाल देणार होते. त्याच दिवशी सकाळी आपल्या १४ सहकाऱ्यांच्या मदतीने सांगली जेलच्या तटावरून उड्या मारून त्यांनी पलायन केले. त्यांनी पळून जाताना पहाऱ्याकडून १९ रायफली, १८२ काडतुसे घेवून पलायन केले. यावेळी पोलीसांनी गोळीबार केला. झालेल्या गोळीबारात एक गोळी दादाच्या खांद्यातून आरपार गेली तर आण्णा पत्रावळे गोळी लागून मरण पावले. त्यांना पुन्हा बंदी बनविण्यात आले. दि.२१/०९/१९४३ रोजी त्यांना ६ वर्षे सक्तमजुरी व ५०० रू.दंडाची शिक्षा झाली.[१७] निकालपत्र देताना त्यावेळचे न्यायमूर्ती श्री.दिवेकर यांनी वसंतदादा पाटील यांच्याबद्दल पुढील उद्‌गार काढले, "आज एका विशिष्ट परिस्थितीत तुम्हाला या कृत्याबद्दल शिक्षा द्यावी लागत आहे. परंतु आपला देश स्वतंत्र असता तर तुमच्या या धाडसाचे कौतुकच झाले असते व पारितोषीक द्यावे लागले असते.[१८] सन १९४६ मध्ये सर्व भूमिगतांना मुंबई सरकारने सोडून दिले. त्याचा फायदा मिळून वसंतदादांची सुटका झाली.

**समारोप :-**अशाप्रकारे वसंतदादा पाटील यांनी सन १९४२ च्या क्रांतीकार्यात ब्रिटीश विरोधी कारवाया केल्या होत्या. सांगली व परिसरामध्ये त्यांनी ब्रिटीशांमध्ये दहशत निर्माण करून ब्रिटीश सत्तेला प्रचंड विरोध केला. भारतास स्वातंत्र्य मिळाले त्यामध्ये त्यांचे योगदान मोठे होते हे निश्चितच! भारत स्वतंत्र झाल्यावर आमदार, मंत्री, मुख्यमंत्री, राज्यपाल इ. महत्त्वाची पदे त्यांनी भुषविली.

**संदर्भ सूची:-**


१) सि.यू.ऍचेसन, कलेक्शन ऑफ थेसीस एंगेजमेंट ॲन्ड सनदी रिलेटिंग टु इंडिया ॲन्ड व नेबरिंग कंट्रीज, खंड ७ पान.२०
२) सहकार महर्षी वसंतदादा पाटील जयंती, सहकार विशेषांक नोव्हेंबर १९९२
३) पाटील मोहन, राजयोग, पान १०
४) मेहेंदळे विश्वास, यशवंतराव ते विलासराव, अनुबंध प्रकाशन पुणे २००७ पान.११३
५) धर्माधिकारी भालचंद्र वि., महाराष्ट्राचा महापुरुष वसंतदादा, विश्वकर्मा प्रकाशन, सातारा, १९८६ पान.१४
६) पाटणे संभाजीराव, साताऱ्याचे कोहिनूर, संस्कृती प्रकाशन, पुणे २०११ पान.२२
७) यादव विजय, दादा एक सेनानी : स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर यांचे चरित्र, स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर स्मारक समिती, उंडाळे २००२ पान.६२
८) शिंदे आबासाहेब, साताराचे प्रतिसरकार, : प्रसंग आणि व्यक्ती, उषा प्रकाशन, कोल्हापूर पान. २२-२३
९) दै. महाराष्ट्र केसरी, दि. १५ /०८/१९९७
१०) लाड जी.डी. पेटलेले स्वातंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य, जी.डी.लाड प्रबोधिनी संस्था, कुंडल १९९५, पान.३४
११) दै.सकाळ दि.१३/११/२०११
१२) होम डिपार्टमेंट स्पेशल ब्रँच, मुंबई अर्काइव्हज् मधील फाईल नं. ११० (११२) १९४३-४४, दि.३० जून १९४३ ता.सातारा पोलिस अधिक्षक यांचे पत्र.
१३) धर्माधिकारी भा.वि., उपरोक्त, पान.३८
१४) लाड जी.डी., उपरोक्त, पान.७३
१५) मुंबई अर्काइव्हज् फाईल नं. १११०(११२) १९४३-४४,दि. २६ जून १९४३ चा सातारा डी.एस.पी ने डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेटना सादर केलेला अहवाल.
१६) धर्माधिकारी भा.वि.,उपरोक्त, पान.३८
१७) कित्ता, पान.४९
१८) दै. तरुण भारत, पुणे (सांगली सत्कार पुरवणी) दि. १२/०९/१९६० पान.६